// सा विद्या या विमुक्तये //
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६ (महाराष्ट्र)
**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**
**"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)**
**Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade**

**ACADEMIC (AFFILIATION) SECTION**

Phone : (02462) 229242/43
Fax : (02462) 229245 / 229325
Website : srtmun.ac.in
e-mail :affi.srtmun@gmail.com

राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तीक
अपघात विमा योजनेबाबत.

## :: परिपत्रक ::

संदर्भ :– मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे–१ यांचे पत्र क्र. उशिसं/२०२३/संकीर्ण/मवि–१/६६३४, दि. २९.०५.२०२३.

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने प्रस्तूत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व संबंधित संस्था/महाविद्यालये यांच्या मा. अध्यक्ष व प्राचार्य यांना कळविण्यात यते की, "राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तीक अपघात विमा योजना" राज्यातील शासकीय विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील मान्यता प्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था/महाविद्यालये, पारंपारीक विद्यापीठ यांच्या अधिकारी/कर्मचारी (कंत्राटी कर्मचारी वगळून) यांना दि. १ ऑगस्ट, २०१७ पासून लागू करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर अपघात विमा योजना अमंलबजावणीच्या अनुषंगाने दरवर्षी माहे फेब्रूवारीच्या वेतन देयकातून अधिकारी /कर्मचारी यांची अपघात विमा योजनेची वर्गणी कपात करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांची आहे. तसेच सदर अपघात विमा योजना ही अत्यंत माफक वर्गणीमध्ये, अपघातामुळे उध्दभवणा–या आर्थिक नुकसानीबाबत भरीव स्वरुपाचे विमा संरक्षण देणांरी कल्याणक्कारी व हितकारक स्वरुपाची योजना आहे. उक्त संस्था/महाविद्यालयासाठी सदरची योजना ही ऐच्छिक स्वरुपाची आहे. त्यामुळे सदर योजनेचा लाभ घेण्याबाबत संबंधित संस्था/महाविद्यालये यांना निर्देश देण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये मा. प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांनी कळविलेले आहे. (सोबत सदर पत्राची प्रत जोडण्यात आलेली आहे.)

तरी सदरील बाब आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. कळावे.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmu.ac.in या संकेतस्थळवार affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२२–२०२३/12
दिनांक :– ०७.०६.२०२३

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिंध्द करावे.

Affi- 28/2023

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड
कुलसचिव कार्यालय
31 MAY 2023
आवक क्र. 2051


महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/ २०२३/संकीर्ण/मवि-१/ 6634 दिनांक- २६.०५.२०२३

29 MAY 2023

29 MAY 2023

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,

उच्च शिक्षण

**विषय: राज्य शासकीय कर्मचारी समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेबाबत.**

**संदर्भ** -१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/ प्र.क्र. ६४/ विमा प्रशासन दि. २४.०१.२०२३

२.वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/ प्र.क्र. ६४/ विमा प्रशासन दि. ११.०८.२०१७

३. सह विमा संचालक, विमा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. प्रविनि-२०२३/ अपघात विमा / जा.क्र. ७६२/ बिगर अभि. दि. २४.०५.२०२३

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. २ च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये " राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा योजना " राज्यातील शासकीय विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील मान्यता प्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये, पारंपारिक विद्यापीठे यांच्या अधिकारी/ कर्मचारी (कंत्राटी कर्मचारी वगळून) यांना दि. १ ऑगस्ट, २०१७ पासून लागू करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सदर अपघात विमा योजना अंमलबजावणीच्या अनुषंगाने दरवर्षी माहे फेब्रुवारी च्या वेतन देयकातून अधिकारी/ कर्मचारी यांची अपघात विमा योजनेची वर्गणी कपात करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी यांची आहे.

तथापि उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त मान्यताप्राप्त अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी या योजनेमध्ये सहभागी झाले नसल्याची बाब विमा संचालनालयाच्या निदर्शनास आली असल्याबाबत संदर्भ क्र. ३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

सदर अपघात विमा योजना ही अत्यंत माफक वर्गणीमध्ये, अपघातामुळे उध्दवणाऱ्या आर्थिक नुकसानीबाबत भरीव स्वरूपाचे विमा संरक्षण देणारी कल्याणकारी व हितकारक स्वरूपाची योजना आहे. उक्त संस्था/ महाविद्यालयांसाठी सदरची योजना ही ऐच्छिक स्वरूपाची आहे. तथापि सदर योजनेबाबतची माहिती मान्यता प्राप्त व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था/ महाविद्यालये, पारंपारिक विद्यापीठांमध्ये कार्यरत सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना अवगत करून देण्याबाबत आपल्या स्तरावरून संबंधित संस्था/ महाविद्यालये व विद्यापीठांना निर्देश देण्यात यावेत.

सोबत- वरीलप्रमाणे.

Esth/ Affiliation

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत -१.कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

२.सह विमा संचालक, विमा संचालनालय, मुंबई